माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /१७४३/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे – १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| शुभांगी प्रल्हाद ससाणे | पोलीस निरीक्षक<br>मंचर पोलीस स्टेशन यांचे कार्यालय, ता. आंबेगाव, जि. पुणे | उपविभागीय पोलीस अधिकारी<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, खेड विभाग, खेड, जि.पुणे |

**(सुनावणी दिनांक - ०८.०९ २०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.१२.०३.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये दिशाभूल करणारी, अर्धवट माहिती असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १८.११.२०२३ | आपल्या पोलीस स्टेशन मधील पोलीस डायरी मधील दि. १२.०९.२०२१ ते FIR No ५२७/२०२१ चा तपास पुर्ण होईपर्यत सर्व नोंदीच्या सर्व पानांच्या प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " स्टेशन डायरी मिळावी मला स्टेशन डायरी तयार करुन दिली परंतु त्यांनी मूळ डायरी दिली नाही."

उपलब्ध अभिलेखावरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१२.२०२३ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०१.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती योग्य असल्याने अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. परंतु अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार माहिती तयार करुन दिली मूळ माहिती दिली नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, मंचर पोलीस स्टेशन, ता.आंबेगाव,जि.पुणे यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र 'अ' मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या तक्रार/ गुन्हयासंबंधी अपिलार्थी यांनी दिलेल्या गुन्हयाच्या फिर्यादी संबंधी दि.१२.०९.२०२१ ते तपास पुर्ण

होईपर्यंत (दि. ३१.१२.२०२१) या दरम्यान स्टेशन डायरीमध्ये ज्या नोंदी घेतल्या असतील त्याची सही शिक्यानिशीची प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, खेड विभाग, खेड, जि.पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /१७४३/२०२४/पुणे 10320 दिनांक - 27/11/24